सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ५७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २१ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## संजय राऊतांनी सिंगापूरला जाऊन मानसोपचार घ्यावेत, खर्च सरकार करेल, देवेंद्र फडणवीसांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रवक्ते आणि राज्यसभा खासदार संजय राऊत हे आपल्या शेलक्या भाषेतील टिप्पणीने सत्ताधारी भाजपा आणि महायुतीमधील नेत्यांना दररोज बेजार करत असतात. त्यामुळे राऊतांकडून होणाऱ्या टीकेला कोणत्या शब्दात प्रत्युत्तर द्यायचं हा प्रश्न अनेकदा त्यांच्या विरोधकांना पडतो. दरम्यान, आज एका कार्यक्रमामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना संजय राऊत यांच्यासंदर्भातील प्रश्न विचारण्यात आल्यावर त्यांनी संजय राऊत यांना मानसोपचारांची आवश्यकता असून, त्यांनी एका चांगल्या रुग्णालयातून मानसोपचार घ्यावेत त्याचा खर्च सरकार करेल, असा टोला लगावला.

मुख्यमंत्र्यांना बदनाम करण्यासाठी नागपूरमध्ये दंगल घडवण्यात आली होती का, या संजय राऊत यांनी उपस्थित केलेल्या शंकेबाबत विचारलं असता देवेंद्र



फडणवीस म्हणाले की, संजय राऊत यांनी आता स्वत:चा तपास करून घेण्याची आवश्यकता आहे. अनेक चांगली मनोरूग्णालये आता तयार झाली आहेत. आवश्यकता असेल तर त्याचा खर्च आम्ही सरकारच्यावतीने करू. अगदीच आवश्यकता भासली तर सिंगापूरचं रुग्णालय चांगलं आहे, असं मला कुणीतरी सांगितलंय. तिथे त्यांना पाठवायचं असेल तर त्याचाही खर्च सरकार देईल, हे मी आजच जाहीर करतो. गरज असेल तर बजेटमध्ये त्याची तरतूद करतो, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

दरम्यान, एबीपी माझा या वृत्तवाहिनीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यापैकी तुमचे लाडके ठाकरे कोणते? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला होता. यावर बोलताना ते म्हणाले की, ठाकरे असे आहेत की, आपण त्यांना लाडकं म्हणायचं आणि त्यांनी आपल्याला दोडकं म्हणायचं. कुठे भानगडीत पडता?, असं विधानही त्यांनी केलं.

### मुख्यमंत्री फडणवीसांची दिशा सालियन प्रकरणात पहिली प्रतिक्रिया

## न्यायालय काय म्हणते? न्यायालयात ते काय पुरावे देत आहेत? यावर पुढची भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

सुशांत सिंग राजपूतची माजी व्यवस्थापक दिशा सालियन मृत्यू प्रकरण तब्बल पाच वर्षानंतर आता पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. दिशाच्या वडिलांनी मुलीच्या मृत्यूचा तपास सीबीआयकडे सोपवण्याची विनंती केली आहे. या प्रकरणाची नव्याने चौकशी करण्याची मागणी सतीश सालियन यांनी याचिकेद्वारे मुंबई उच्च न्यायालयाकडे केली आहे. या याचिकेत दिशा सालियनच्या वडिलांनी ठाकरे गटाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याची मागणी केली आहे. यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या जोरदार फैरी झडल्या. अनेक दावे-प्रतिदावे करण्यात आले. यातच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी



दिशा सालियन प्रकरणात पहिल्यांदा प्रतिक्रिया देताना शासनाची भूमिका मांडत स्पष्ट शब्दांत भाष्य केले आहे.

ही सगळी चर्चा न्यायालयातील याचिकेमुळे सुरू झाली. उच्च न्यायालयात एका वकिलाने याचिका दाखल केली आहे. दिशा सालियनच्या वडिलांनीही एक मुलाखत दिली आहे. शासनाची भूमिका यासंदर्भात पक्की आहे. न्यायालय काय म्हणते? न्यायालयात ते काय पुरावे देत आहेत? यावर पुढची भूमिका ठरेल. आत्तातरी शासनाच्या किंवा पोलिसांच्या पातळीवर हा विषय नाही. न्यायालय ज्या प्रकारे आम्हाला आदेश देईल किंवा न्यायालयात जर काही नवीन पुरावे, गोष्टी आल्या तर त्या आधारावर त्या वेळी सरकार निर्णय घेईल. आत्तातरी आम्ही न्यायालयाकडे नजर ठेवून आहोत, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. ते एबीपी माझाच्या कार्यक्रमात बोलत होते.

दरम्यान, १४व्या मजल्यावरून पडूनही दिशाच्या शरीरावर एकही जखम कशी झाली नाही? हा प्रश्न दिशा सालियनच्या वडिलांनी उपस्थित केला. या आधारावर दिशाने आत्महत्या केली नसून तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यांच्या वकिलांनी यात थेट आदित्य ठाकरे, उद्धव ठाकरे व सूरज पांचोली यांची आरोपी म्हणून नाव घेत खळबळ उडवून दिली आहे.

## बाळासाहेब असते तर तुमचा गौरवच केला असता; राणेंकडून चित्रा वाघ यांना शाब्बासकी!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान भाजपच्या विधानपरिषद आमदार चित्रा वाघ यांनी दिशा सालियान मृत्यू प्रकरणावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांना कोंडीत पकडलं. चित्रा वाघ यांनी केलेल्या आरोपांवरून ठाकरेंच्या शिवसेनेकडून त्यांना लक्ष्य केलं जाऊ लागल्यानंतर आता भाजप नेते आणि खासदार नारायण राणे यांनी वाघ यांची पाठराखण केली आहे. आज बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी तुमचा गौरवच केला असता, असं राणे यांनी चित्रा वाघ यांना उद्देशून म्हटलं आहे.



नारायण राणे यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, वा! चित्राताई वाघ वा! छत्रपती शिवरायांच्या १५ कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्रात एका निरपराध मुलीवर अत्याचार करुन तिचा खून करणाऱ्यांना आपण चव्हाट्यावर आणले. आपल्याला विरोध करणाऱ्यांच्याही तुम्ही चिंधड्या उडवल्या. तुमच्यासारख्या लढवय्या वाघिणींची महाराष्ट्राला गरज आहे. आज आदरणीय बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी तुमचा गौरवच केला असता. लगे रहो चित्राताई, अशा शब्दांत राणे यांनी चित्रा वाघ यांचं कौतुक केलं आहे.

**मी अशीच लढत राहीन**

नारायण राणे यांच्याकडून कौतुक झाल्यानंतर चित्रा वाघ यांनी सोशल मीडियावर त्यांचे आभार मानले आहेत. चित्रा वाघ म्हणाल्या की, धन्यवाद राणे साहेबमी सत्यासाठी आणि न्यायासाठी अशीच लढत राहीन आणि जेव्हा तुमच्यासारखे ज्येष्ठ नेते पाठीशी उभे राहतात तेव्हा लढण्याची ताकद आणखीनच दुणावते.

## ब्राह्मणवाडा थडी मंडळाला अतिवृष्टीच्या मदतीतून वगळले

### ७ हजार ४०० शेतकऱ्यांना बसला फटका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१चांदूर बाजार**

तालुक्यातील अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना २३ सप्टेंबर २०२४ शासन निर्णयानुसार आर्थिक मदत मिळणे क्रमप्राप्त होते. त्यासाठी स्थानिक महसूल प्रशासनाकडून अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी पीकनिहाय नुकसानभरपाईच्या निधीची मागणी करणे गरजेचे होते. मात्र, तालुक्यातील तीन महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली असताना दोनच महसूल मंडळांसाठी निधीची मागणी महसूल व कृषी विभागाने केली. ब्राह्मणवाडा थडी महसूल मंडळाला वगळल्याने त्याचा फटका अंदाजे ७ हजार ४०० शेतकऱ्यांना बसला आहे.



> तांत्रिक अडचणींमुळे ही चूक झाली असावी. ब्राह्मणवाडा थडी मंडळातील अतिवृष्टीच्या पीक नुकसानीची माहिती घेण्यात येईल. विशेष बाबअंतर्गत निधीची मागणी करून मदत देण्यात येईल.
>
> **– रामदास शेळके, तहसीलदार, चांदूर बा.**

तालुक्यातील सात मंडळांपैकी जुलै व ऑगस्ट महिन्यांत करजगाव, तळेगाव मोहना व ब्राह्मणवाडा थडी या तीन महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली होती. यापैकी करजगाव व तळेगाव मोहना या दोन मंडळांतील शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी पीक नुकसानासाठी मदत निधीची मागणी महसूल व कृषी विभागाने केली आहे. करजगाव मंडळातील २७९८ शेतकऱ्यांच्या, २१४७ हेक्टरच्या पीक नुकसानासाठी २ कोटी ९१ लाख ८५ लाख ८७२ रुपये, तर तळेगाव मोहना मंडळातील ५२७६ शेतकऱ्यांच्या ४७१५.९२ हेक्टरसाठी ६ कोटी ४१ लाख ३६ हजार ५१२ रुपये निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.

**प्रशासनाला ब्राम्हणवाडा शेतकऱ्यांचा विसर**

ब्राह्मणवाडा थडी मंडळात तीन वेळच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पीकनिहाय झालेले नुकसान याचे पाहणी सर्वेक्षण करण्याचेही सौजन्य महसूल व कृषी विभागाने दाखविले नाही. तालुक्यातील दोन मंडळांतील शेतकऱ्यांसाठी अतिवृष्टीचा निधी मागणारे प्रशासन ब्राह्मणवाडा थडी मंडळातील शेतकऱ्यांना मात्र सपशेल विसरले. ७४०० ब्राह्मणवाडा थडी महसूल मंडळाला अतिवृष्टीच्या मदतीपासून वगळल्याने त्याचा फटका मंडळातील अंदाजे ७ हजार ४०० शेतकऱ्यांना बसला आहे.

## ‘कुठेतरी काहीतरी षडयंत्र…’, नागपूरच्या हिंसाचारावर इम्तियाज जलील यांची प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २१ मुंबई :**

एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी नागपूर हिंसाचाराच्या घटनेवर आपली सविस्तर प्रतिक्रिया दिली. त्यांनी या घटनेवरुन अप्रत्यक्षपणे भाजपच्याच दिशेला बोट दाखवलं. तुम्ही औरंगजेबाचा फोटो जाळला आणि त्यासोबत जी एक चादर होती. त्यावर कुरानिक शब्द होते, जे आज अनेक भाजप-शिवसेनेचे लोक म्हणत होते की, अफवा पसरली होती. त्यांना काय वाटलं की, औरंगजेबाची फोटो दाखवत आहोत, पण कोणतीही रिॲक्शन मिळत नाही. आपण इतकं बाहू केलंय की, होळी आपल्यासाठी खूप महत्त्वाचा सण. मी सुद्धा पुण्यात पत्रकारांसोबत होळी खेळायचो. होळीच्या दिवशी जुम्मा की नमाज, मुसलान बाहर निकलेगा और हिंदू होली खेलते रहेंगे, असं वातावरण तयार करण्यात आलं होतं, जेणेकरुन महाराष्ट्र आणि देशात काय होणार आहे. त्यावेळीही मी सांगितलं होतं की,



मला माझ्या महाराष्ट्रावर विश्वास आहे की मुसलमान नमाज आदा करतील आणि आमचे हिंदू बांधव त्याच दिवशी होळीदेखील खेळतील. त्याच विश्वासाने मी सांगितलं होतं, असं इम्तियाज जलील म्हणाले.

त्या दिवशी कुठेही गालबोट लागलं नाही. मग त्यांना वाटलं की, फोटो जाळला, होळीत काही झालं नाही. मग ते कुरानिक वर्सेस काही कारण नव्हतं. ते जेव्हा त्या लोकांनी केलं, जे कुणी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करत असतील त्यांच्यावर कारवाई करा. पण कृपया एकतर्फी कारवाई करु नका. नाहीतर जे सुरुवात करणारे लोकं आहेत, त्यांना दोन-तीन हजार रुपयात बेल देण्यात आली आहे. आम्ही असं केलं असतं तर सोडलं असतं का?.

## संघ मुख्यालयाची रेकी करणाऱ्या दहशतवाद्याचा जामीन अर्ज फेटाळला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

रेशीमबाग येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालयाची रेकी करून ती माहिती पाकिस्तानमधील उमर याला पाठविणारा दहतवादी रईस अहमद शेख याचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने शुक्रवारी फेटाळून लावला. न्यायमूर्तीद्वय नितीन



सूर्यवंशी व प्रवीण पाटील यांनी हा निर्णय दिला.

रईस जम्मू-काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यातील पोरा येथील रहिवासी आणि जैश-ए-मोहम्मद या बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटनेचा सदस्य आहे. सुरक्षा यंत्रणांनी त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवल्यानंतर त्याचा कट उघडकीस आला. मुख्य सरकारी वकील ज्येष्ठ विधिज्ञ देवेंद्र चव्हाण यांनी रईसच्या दहशतवादी कनेक्शनबाबत न्यायालयाला ठोस माहिती दिली. रईसविरुद्ध यापूर्वी जम्मू-काश्मीरमध्ये जिवंत हातबाँब बाळगल्याप्रकरणी खटला दाखल आहे. न्यायालयाने उपलब्ध पुराव्याच्या आधारावर रईसला जामीन नाकारला. राष्ट्रीय सुरक्षेसाठी त्याला कारागृहात ठेवणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

## आता महाराष्ट्राला ‘लॉटरी’ लागणार; सरकार ‘केरळ पॅटर्न’ राबवण्याच्या तयारीत; भाऊंवर जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २१ मुंबई**

लाडकी बहीण योजनेमुळे अन्य योजनांना कात्री लावण्याची वेळ महायुती सरकारवर आली आहे. एकीकडे लाडकी बहीण योजनेच्या निकषांची काटेकोर अंमलबजावणी करुन लाभार्थ्यांच्या संख्या कमी करुन सरकारी तिजोरीवरील भार हलका करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. तर दुसरीकडे उत्पन्न आणि महसूल वाढीसाठी सरकार विविध मार्ग शोधत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सरकार केरळ पॅटर्न राबवण्याच्या विचारात आहे.

विधिमंडळ अधिवेशनात अर्थमंत्री अजित पवारांनी भाजप नेते आणि माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्त्वात एका समितीची घोषणा केली आहे. विधिमंडळाचं अधिवेशन २६ मार्चपर्यंत चालेल. त्याआधी मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखालील समिती आकारास येईल. राज्याचा महसूल वाढवण्याच्या दृष्टीकोनातून ही समिती काम



करेल.

अर्थसंकल्पावरील चर्चेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी महत्त्वाचे मुद्दे मांडले. ’राज्याचा महसूल वाढवण्यासाठी सरकार विविध पातळ्यांवर प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या माध्यमातूनही प्रयत्न सुरु आहेत. लोकप्रतिनिधींची एक समिती यासाठी तयार केली जाईल. केरळच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या माध्यमातून मिळणारा महसूल कसा वाढवता येईल याच्या शिफारशी समितीकडून केल्या जातील. सुधीरभाऊ मुनगंटीवार या समितीचे अध्यक्ष असतील. ही समिती महिन्याभरात आपला अहवाल देईल,’ असं अजित पवार म्हणाले.

राज्याची अर्थव्यवस्था चांगल्या स्थितीत असून वित्तीय शिस्त कायम ठेवण्याबद्दल सरकार गंभीर असल्याचं अजित पवारांनी विधिमंडळात सांगितलं. ’महसुली तूट राज्याच्या जीडीपीच्या १ टक्क्याच्या खाली राखण्यात आपल्याला यश आलं आहे. तर वित्तीय तूट एकूण जीडीपीच्या ३ टक्क्यांच्या खाली आहे. २०११-१२ या आर्थिक वर्षात राज्याचा जीडीपी १२.८० लाख कोटी होता. तो २०२५-२६ मध्ये ४९.३९ लाख कोटींच्या घरात राहण्याचा अंदाज आहे,’ असं अजित पवार यांनी सांगितलं.

## संपादकीय ......

# अर्थकेंद्रित पालकांमुळे परीक्षांमध्ये गैरप्रकारांची वाढ

राज्यात दहावी, बारावीच्या परीक्षा सुरू झाल्या की, नेहमीप्रमाणे परीक्षेतील गैरप्रकारासंदर्भात बातम्या पुढे येऊ लागतात. कुठे पेपर फुटल्याचे प्रकार घडतात. कोठे पालकांची पाल्याला कॉपी पुरवण्यात आघाडी असते. कोठे आपल्या मित्राला मदत करण्यासाठी मित्र मदतीचा हात देत असतात. कोठे आपल्या शाळेचा निकाल उंचावण्यासाठी शिक्षकच कॉपी पुरवत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत.अहिल्यानगर जिल्ह्यात आपल्या पदाचा विचार न करता एक नायब तहसिलदार कॉपी पुरवत असल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचवेळी संस्था चालकांची शाळांवर निकालाच्या टक्केवारीची सक्ती, विद्यार्थ्यांनाही मार्कांचा आलेख उंचावलेला हवा आहे. अर्थात पैकीच्या पैकी मार्कांसाठी धावाधाव सुरू आहे. शिकवणी वर्गात विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. त्यासाठी पालक आर्थिक भार सोसत आहेत.त्यामुळे तेथील व्यवस्थापनाने धावपळ करत विद्यार्थ्यांना मार्क मिळावेत म्हणून वाममार्गी मदत करण्याची वाट निर्माण करण्याचा प्रयत्न घडणे सहाजिक आहे. ही असणारी धावपळ आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षणातून अपेक्षित विकास म्हणून नाही तर केवळ मार्क मिळावेत म्हणून अट्टहास सुरू आहे. एकूणच शिक्षण क्षेत्रात मार्कांशिवाय कोठेही दुसरी चर्चा होताना दिसत नाही.शिक्षणाचे यश, अपयश फक्त मार्कांवर मोजले जाते आहे. घर, शाळा आणि भोवतालमध्ये शिकण्याच्या मूलभूत अर्थापेक्षा केवळ मार्कांचाच विचार पुढे सरसावतो आहे. शिक्षणात समग्र विकासापेक्षाही पालकांना, शाळांना फक्त मार्क नेमके कशासाठी हवे आहेत? यामागे महत्त्वाचे जे कारण आहे त्यात आजच्या शिक्षणाच्या बाजारात सुरू असणार्या स्पर्धेत स्थान प्राप्त करण्यासाठी. आपल्या भोवतालमध्ये विविध स्वरूपाची प्रचंड मोठी स्पर्धा आहे.दुर्दैवाने ती स्पर्धा काही निकोप आहे असे म्हणता येणार नाही. शिक्षण म्हणजे स्पर्धा नाही तर जीवनास वाट दाखवणारा मार्ग आहे. जगातील विविध क्षेत्रात जेव्हा गैरप्रकार घडतात तेव्हा त्यावर मात करण्यासाठी शिक्षणाचा विचार महत्त्वाचा ठरतो. समाजात वाईट परंपरा, गैरप्रकार सुरू होतात तेव्हा संस्काराची पेरणी शिक्षणातून व्हावी, अशी अपेक्षा असते. समाजात घडणार्या चुकीच्या घटनांवर मात करण्यासाठी शिक्षणाकडून अपेक्षा केली जात असते.दुर्दैवाने वर्तमानात शिक्षण क्षेत्रातच गैरप्रकार घडत आहेत. शिक्षणाशिवाय समाजात संस्काराची पेरणी कशी होणार ? समाजाने उन्नत आणि प्रगत अवस्थेकडे झेप घ्यावी असे वाटत असेल, तर शिक्षण अधिक मूल्याधिष्ठीत असण्याची गरज आहे. अर्थात शिक्षणात असणारी जीवघेणी स्पर्धा जोवर थांबत नाही, तोवर शिक्षणातील गैरप्रकारालाही आळा बसणार नाही. कोणतीही स्पर्धा अनेकदा जीवघेणी ठरू शकते किंवा त्या क्षेत्रात गैरप्रकाराची भर घालू शकते. त्याचबरोबर कोणत्याही प्रकारची सक्ती नेहमीच वाममार्गाच्या वाटा निर्माण करत असते.सध्या आपल्या सामाजिक व्यवस्थेत मूल्य, संस्कार, ज्ञानापेक्षा आर्थिक उन्नतीला अधिक महत्त्व आले आहे. शिक्षणाचा अर्थ हाताला काम देणे हा आहेच, पण त्याबरोबर डोक्याला विचार, हृदयाला भाव मिळणे महत्त्वाचे. मात्र वर्तमानात शिक्षणाचा संबंध आर्थिक विकासापुरताच मर्यादित झाला आहे. हा खरे तर चिंतेचा विषय होऊन बसला आहे.मुळात शिकणे म्हणजे ज्ञानाची साधना आहे. आपण काय शिकलो? कसे शिकतो आहोत? शिकण्यातील नेमक्या काय उणिवा आहेत? शिकण्याच्या प्रक्रियेतील अडथळे काय आहेत हे जाणून घेण्यासाठी शिक्षणात मूल्यमापनाचा विचार अंतर्भूत आहे. मात्र वर्तमानात मूल्यमापनाचा मूलभूत विचार हरवत चालला आहे. आज मात्र मूल्यमापनाच्या अर्थाला बाजूला सारत मूल्यमापन म्हणजे केवळ मार्क असा विचार पुढे आला आहे.परीक्षेत मिळणारे मार्क म्हणजे गुणवत्ता अशीच धारणा बनते आहे. या धारणेमुळे शिकण्याच्या प्रक्रियेकडे आपोआप दुर्लक्ष होत आहे. खरंतर शिकण्यासाठी विद्यार्थ्याला काही वेळ द्यावा लागतो. त्यासाठी शिकण्याच्या प्रक्रियेकडे गंभीरपणे पाहण्याची गरज असते. शिक्षणात शिकणे महत्त्वाचे आहे, बाकी सर्व गोष्टी दुय्यम आहेत, हे सतत लक्षात घेण्याची गरज आहे. मात्र दुर्दैवाने शिक्षणाचा अर्थ हरवत चालल्याने शिक्षणात गैरप्रकाराचा शिरकाव वाढत चालला आहे. ते करताना आपण काही चुकीचे करत आहोत याची खंतही वाटेनाशी झाली आहे हे अधिक दुर्दैवी आहे.शिकण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थ्याची अभिरूची, कल, बौध्दिक क्षमता यांचा विचार करण्याची गरज असते. विद्यार्थ्यांच्या क्षमता लक्षात घेतल्या तरच मार्कांची स्पर्धा होऊ शकते. मात्र क्षमता न जाणता आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठीचे ओझे त्यांच्यावर लादले जात आहे. शिकण्यासाठीच्या क्षमतांकडे दुर्लक्ष करत पालक वर्ग मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांकडून अपेक्षा करत आहे. पालक आपले अपुरे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुलांना पुढे करत आहेत. मुलांमध्ये क्षमता, अभिरूची ज्ञात आहे. अशा वेळी पालकांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी मुले पुढे सरसावत आहेत. ती त्यांना पालकांसाठी गरज वाटते आहे.

# अमरावती महानगरपालिकेतर्फे आयोजित कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती–** दिनांक १५ व १६ मार्च रोजी अमरावती महानगरपालिकेतर्फे आयोजित कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण नुकतेच उत्साहात पार पडले.

स्थानिक अभियंता भवन येथे आयोजित या बक्षीस वितरण कार्यक्रमाला अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त सचिन कलंत्रे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख ,उपायुक्त नरेंद्र वानखडे, डॉ. मेघना वासनकर, योगेश पिठे, मुख्यलेखापरीक्षक शामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, दीप्ती गायकवाड, कार्यकारी अभियंता रविंद्र पवार, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, जनसंपर्क अधिकारी भूषण पुसतकर, कार्यशाळा उपअभियंता लक्ष्मण पावडे, लेखा विभाग अधीक्षक प्रवीण इंगोले, सामान्य प्रशासन विभाग अधीक्षक नंदू पवार, बाजार परवाना अधीक्षक उदय चव्हाण, अजय विंचुरकर, राजेश आगरकर, आनंद जोशी, शिक्षक अधिकारी डॉक्टर प्रकाश मेश्राम, शाळा निरीक्षक योगेश पखाले, क्रीडा निरीक्षक प्रवीण ठाकरे, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी पंकज सपकाळ, ज्योती बनसोड प्रामुख्याने उपस्थित होते.



पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या मैदानावर क्रिकेटचे सामने भरवण्यात आले होते. यामध्ये एकूण ०९ संघांनी सहभाग नोंदविला होता तसेच व्हॉलीबॉल चे सामने हे अंबापेठ स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर आयोजित केले होते. त्यामध्ये एकूण ०५ संघांनी सहभाग नोंदविला होता.

कार्यक्रमा वेळी सर्व खेळ प्रकारातील विजेते, उपविजेते टीम तसेच दोन महिने आधी मोर्शी येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय नगरपरिषद व महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्मचारी खेळाडूंचा व शिक्षकांचा यावेळी ट्रॉफी व मेडल देऊन सत्कार माननीय आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान अमरावती शहरातील सुकन्या भारती फुलमाळी हिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करून तसेच नुकतेच पार पडलेल्या थझङ टूर्नामेंट मध्ये गुजरात जायंट्स या संघाकडून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मनपा आयुक्त यांच्या हस्ते तिचा मोमेंटो सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

दररोजच्या दैनंदिन कामकाजातून आपले स्वतःचे छंद जोपासता यावे व स्वतःला विरंगुळा मिळावा या उद्देशाने अशा प्रकारच्या स्पर्धा दरवर्षी नियमितपणे होणे अपेक्षित असून अशा स्पर्धा झाल्यास कर्मचाऱ्यांमध्ये एकजुटीची भावना वाढण्यास मदत होईल होते असे मत आपले आपले मनोगत दरम्यान आयुक्त सचिन कलंत्रे यांनी व्यक्त केले.उद्देश – कर्मचा–यामध्ये एकबंध आपला, वातावरण किंवा काम करतांना नविन ऊर्जा मिळावी, सतत काम केल्यावर एक आनंदी वातावरण निर्मितीकरिता मा.आयुक्त सचिन कलंत्रे यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली. मोठ्या संख्येने भाग घेतला. भविष्यात मोठा कार्यक्रम नियमित घ्यावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

सुत्रसंचालन प्रणाली ठाकरे व प्रियंका हंबर्डे यांनी केले.

# रोजगार हमी योजनेतून मिळतेय विहीर; किती अनुदान अन् कसा मिळतो लाभ? वाचा सविस्तर

दि.२१विदर्भ प्रजासत्ताक

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणण्यासाठी शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून विहीर खुदाईसाठी प्रोत्साहन दिले जाते.

पात्र शेतकऱ्यांनी ग्रामपंचायतीकडे अर्ज केल्यानंतर निवड केली जाते. शासनाच्या अटीमध्ये तो पात्र ठरल्यानंतर विहिरीच्या कामाच्या टप्प्यानुसार अनुदानाचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग केले जातात.

या शेतकऱ्यांना मिळतो लाभ

- अनुसूचित जाती/जमाती भटक्या जमाती व विमुक्त जाती.
- दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी.
- महिला–कर्ता असलेली कुटुंबे.
- विकलांग व्यक्ती कर्ता असलेली कुटुंबे.
- जमीन सुधारणांचे लाभार्थी.
- इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी.
- सिमांत शेतकरी (२.५ एकर पर्यंत शेतजमीन)
- अल्प भूधारक शेतकरी (५ एकरपर्यंत शेतजमीन)

हे आहेत मंजुरीचे निकष

- अर्जदाराकडे किमान एक एकर शेतजमीन सलग असावी.
- पिण्याच्या पाण्याच्या विहिरीपासून ५०० मीटरपेक्षा जास्त अंतरावर सिंचन विहीर खोदता येईल.
- दोन विहिरींमध्ये १५० मीटर अंतराची अट मागासवर्गीय, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी लागू नाही.
- लाभधारकाच्या सातबाऱ्यावर याआधीच विहिरीची नोंद असू नये.
- अर्जदार हा जॉब कार्डधारक असला पाहिजे.


अधिक माहितीसाठी संपर्क

पात्र शेतकऱ्यांनी आपल्या गावच्या ग्रामपंचायत कार्यालयात या योजनेसाठी लेखी अर्ज द्यावेत.












## चहा पावडर अशी करा रियूज

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्या प्रत्येकाला चहा प्यायला खूप आवडते. आजही अनेकांचा दिवस चहाच्या कपाने सुरू होतो. चहा हे भारतात सर्वात लोकप्रिय पेय आहे. हिवाळा असो वा उन्हाळा, चहाप्रेमी कोणताही भेदभाव न करता त्यावर प्रेम करतात. चहा बनवल्यानंतर उरलेल्या चहाच्या पानांचा वापर तुम्ही रोजच्या वापरासाठी करू शकता. चहाच्या पानांचे असंख्य फायदे आणि उपयोग आहेत. विशेषतः, उरलेल्या चहाच्या पानांचा वापर तुम्ही अनेक




आरोग्य समस्या दूर करण्यासाठी आणि त्वचा आणि केसांची काळजी घेण्यासाठी करू शकता. आज आपण जाणून घेऊयात, चहा पावडर कशी रियूज करायची.

**स्क्रब तयार करणे–** चहा पावडरच्या मदतीने तुम्ही स्क्रब देखील बनवू शकता. चहा पावडरचा स्क्रब त्वचेवरील मृत पेशी आणि टॅनिंग दूर करण्यासाठी उत्तम आहे. तसेच त्वचेला नैसर्गिक चमक मिळवण्यासाठी चांगला उपाय आहे.यासाठी चहा पावडरमध्ये मध, गुलाबपाणी, तांदळाचे पीठ आणि लिंबाचा रस मिसळून स्क्रब तयार करा.

**स्वयंपाकघर स्वच्छ करणे–** स्वयंपाकघर स्वच्छ करण्यासाठी चहाच्या पानांचा वापर करा, ते जमिनीवरील आणि भांड्यांमधील वंगण आणि घाण काढून टाकण्यास मदत करते.

**केसांचे कंडिशनर–** चहाच्या पानांचे उकळलेले पाणी केसांसाठी नैसर्गिक कंडिशनर म्हणून काम करते.उरलेल्या चहाच्या पानांना पुन्हा उकळून घ्या. हे आपल्याला पचनासाठी उत्तम आहे.

डोळ्यांसाठी आरामदायक

चहा पावडरची टी बॅग ही आपल्या डोळ्यांसाठी खूप फायदेशीर आहे.

**फर्निचर पॉलिश –**उरलेल्या चहाच्या पानांचा फर्निचर पॉलिश म्हणून वापर करा, त्यामुळे फर्निचरला चमक आणि ताकद मिळते.

# शासकीय जमीन हडपणार्यांवर कारवाई करा

## टायगर फोर्सची पत्रकार परिषदेत मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१**अमरावती चांदुर रेल्वे तालुक्यातील बग्गी येथील गायरान जमीन मौजे जहागीरपुर येथील गट नं. १४४ एकूण क्षेत्रफळ,३ हेक्टर ५८आर जमीन बग्गी येथील रहिवासी समीर विजयराव भेंडे यांनी गैर कायदेशीररित्या हडपण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यावर कारवाई करून त्याला पाठीशी घालणार्या तहसीलदारावर पण कार्यवाही करावी,अशी मागणी गुरुवारी २० मार्च रोजी एका पत्रकार परिषदेतटायगर फोर्सचे गणेशदास गायकवाड यांनी केली आहे.



त्यांनी सांगितले की, या संदर्भात प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्यानंतरही याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. या गावात दलित–आदिवासी बांधव भूमिहीन आहेत. त्या जमिनीचा योग्य तो लाभ भूमिहीनांना होत नाही. या गैरव्यवहाराची तक्रार जिल्हाधिकारींकडे करण्यात आली. उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदारांना चौकशी करण्यासाठी तीन वेळा पत्र देऊन सुद्धा चांदुर रेल्वे येथील तहसीलदार या प्रकरणात चौकशीला विलंब करीत आहे. यामुळे या प्रकरणात ते संशयाच्या भोवर्यात आहे. या प्रकरणाची तत्काळ चौकशी करून भेंडे व तहसीलदारांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. पत्रकार परिषदेला गणेश गायकवाड यांच्यासोबत दादाराव स्वर्गे, सतीश डोळे, गणेश परतेकी, प्रकाश दांडगे, धर्मेंद्र वानखडे, प्रवीण मोखळे आदी उपस्थित होते.

# एचएसआरपी नंबरप्लेट बसवण्यासाठी नवी डेडलाईन; वाहनचालकांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१मुंबई** – राज्यात २०१९ पूर्वीच्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (क्छठझ) बसवणं बंधनकारक केले आहे. यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदत दिली होती. परंतु अद्याप जुन्या वाहनांना क्छठझ नंबरप्लेट बसवण्याचं काम संथगतीने सुरू असल्याने ही मुदत आणखी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या परिवहन खात्याने याबाबत परिपत्रक काढून ३० जून २०२५ पर्यंत हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्यास मुदतवाढ दिली आहे.

देशातील सर्व वाहन उत्पादक कंपन्यांना १ एप्रिल २०१९ पासून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट देणे बंधनकारक केले आहे. तेव्हापासून नव्याने वाहन खरेदी केल्यानंतर या नंबरप्लेट उपलब्ध होतात. हाय सिक्युरिटी नंबरप्लेट वाहनाच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी तयार करण्यात आली आहे. एप्रिल २०१९ नंतर बाजारात येणाऱ्या सर्व वाहनांना ती अनिवार्य आहे. परंतु २०१९ पूर्वीच्या जुन्या वाहनांनाही ही नंबरप्लेट अनिवार्य करण्यात आली आहे.



राज्यात २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सुमारे १ कोटी २५ लाख वाहनांवर हाय स्पीड प्लेट बसविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यासाठी राज्यातील आरटीओ कार्यालयांत तीन झोनमध्ये ३ वेगवेगळ्या संस्थांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार तीन झोनमध्ये अनुक्रमे १२, १६ आणि २७आरटीओ कार्यालयांचा समावेश आहे. या वाहनांवर आता ३० जून २०२५ पूर्वी एचएसआरपी बसविणे बंधनकारक असून त्यानंतर एचएसआरपी नसलेल्या गाड्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

अशी असते एचएसआरपी

ॲल्युमिनियमपासून बनलेली

जाडी १ मिलीमीटरपेक्षा थोडी अधिक

क्रोमियम आधारित होलोग्राम स्टिकर आणि टॅम्पर–प्रूफ लॉक

होलोग्राम खाली लेझर बैंडेड १० अंकी पिन कोड असतो

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २१ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


## कार कंपनी सीईओ च्या अपहरणाचा थरार, माजी कर्मचाऱ्यानं रचला कट; पोलिसांची सिनेस्टाईल कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती** – बडनेरा मार्गावरील एका नामांकित कार कंपनीच्या सीईओचे चाकूच्या धाकावर अपहरण करण्यात आले. मात्र राजापेठ पोलिसांनी माहिती मिळताच तात्काळ घटनास्थळ गाठले. तथा लोकेशननुसार अपहरणकर्त्यांचा पाठलाग केला. बडनेरात आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले. त्यामुळे अपहृत सीईओची सुखरुप सुटका झाली. अपहरणकर्त्यांमध्ये त्याच कंपनीतील एका माजी कर्मचाऱ्याचा समावेश आहे. २० मार्च रोजी दुपारी तीन वाजताच्या सुमारास हे फसलेले अपहरणनाट्य रंगले. राजापेठ पोलिसांच्या डीबीने ही यशस्वी कारवाई केली. मो. शरीफ खान मो. शहीद खान (५५, रा. रोज कॉलनी, नागपूर) असे 'सीईओ'चे नाव आहे. आनंद सुरेश ओगले (३०, रा. यशोदानगर) आणि अक्षय सुधीर खुळे (३१, रा. किरणनगर) असे अटक अपहरणकर्त्यांची नावे आहेत.मो. शरीफ खान हे बडनेरा मार्गावरील कंपनीच्या कार सर्व्हिस सेंटरसमोर कारने आले. त्यावेळी त्यांच्या कारचा चालकसुध्दा कारमध्ये होता. त्याचवेळी आनंद ओगले व अक्षय खुळे हे दोघे त्या ठिकाणी आले व त्यांनी चाकूचा धाक दाखवला तसेच लोखंडी रॉडने मारहाण केली. जबरीने त्याच कारमध्ये बसवले. त्यानंतर आनंद ओगलेने कार चालकाला बाजूच्या सीटवर बसण्यास सांगितले आणि स्वत: कारचे स्टेअरींग ताब्यात घेतले. याचवेळी खुळे हा मो. शरीफ यांना चाकू लावून मागे बसला, त्यानंतर त्यांनी काहीवेळ शहरात कार फिरवली.



**ठाणेदारांनी घेतली दखल**

ओगलेने सीईओला आम्हाला एटीएममधून पैसे काढून दे, असे सांगितले. त्यामुळे सीईओने त्यांना एका एटीएममधून पंधरा हजार रुपयेदेखील काढून दिले. त्यानंतर दारु घेवून मागितली. दुसरीकडे सीईओचे अपहरण झाल्याचे लक्षात येताच कार कंपनीमधील काही कर्मचाऱ्यांनी तात्काळ राजापेठ ठाण्यात धाव घेतली. त्यांनी घडलेला प्रकार ठाणेदार पुनित कुलट यांना सांगितला. ठाणेदारांनी तत्काळ डिबी पथकाला अपहरणकर्त्यांचा पाठलाग करण्यास सांगितले.

**बडनेऱ्यात पकडले** – बडनेरातील चांदणी चौकाजवळ सीओची कार पोलिसांच्या नजरेत पडली. पोलिसांनी तत्काळ कार थांबवून अपहरणकर्त्यांना ताब्यात घेतले तसेच सीओंची सुटका केली. अपहरणकर्त्यांनी केलेल्या मारहाणीत त्यांना दुखापत झाली, त्यामुळे रुग्णालयात पाठवले. या प्रकरणात राजापेठ पोलिसांनी आनंद ओगले आणि अक्षय खुळे या दोघांविरुध्द खंडणी व खुनाच्या ईराद्याने अपहरण करणे या कलमान्वये गुन्हे दाखल करून अटक केली आहे.

## राज्यात ऊन-पावसाचा खेळ सुरूच! पश्चिम महाराष्ट्रात तापला, विदर्भात पावसाचा येलो अलर्ट





विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती**

राज्यात सध्या ऊन-पावासाचा खेळ सुरू आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील तापमान चाळीशी पार गेले आहे. प्रचंड उकाडा वाढला आहे तर दुसरीकडे अनेक ठिकाणी पाऊस देखील पडत आहे. अशात आजही राज्यात पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे विदर्भात आज वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भात आज वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यांना आज पावसाचा येलो अलर्टसह काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. अमरावती, वाशिम, नागपूर, गडचिरोली येथे पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

तर यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया या ठिकाणी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाकडून १९ तारखेपासून पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. पण आजपासून ढगाळ वातावरणासह पावसाचा अंदाज व्यक्त केला जात आहे.तर विदर्भ वगळता राज्यातील अनेक जिल्ह्यात तापमानात अंशतः घटले आहे. पुणे, सातारा आणि सांगली मध्ये पारा ४० अंश सेल्सिअसच्या खाली गेला आहे. मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात सुद्धा काहीसा दिलासा मिळाला आहे. बीड, परभणी, नांदेड, धाराशिव येथे ३८ अंश डिग्री सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

विदर्भात मात्र उन्हाची तीव्रता अधिक आहे. वाशीम येथे सर्वाधिक म्हणजे ४०.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. अमरावती,नागपूर, वर्धा, अकोला या जिल्ह्यात सुद्धा ३९ अंश डिग्री सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

## उन्हामुळे लिंबाच्या मागणीत प्रचंड वाढ, आवक निम्म्यावर लिंबूचे दर १६० रुपये किलोवर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती** – उन्हाच्या तीव्रतेमुळे सरबताच्या तयारीसाठी लागणाऱ्या लिंबाच्या मागणीत प्रचंड वाढ झाली आहे. मागणीच्या वाढीसोबतच लिंबाच्या दरातही लक्षणीय वाढ झाली आहे. एक महिना पूर्वी जे लिंबू ५० रुपये किलो मिळत होते, ते आता १६० रुपये किलोच्या दराने विकले जात आहेत.

काही दिवसांपासून शहर आणि परिसरात तापमानाच्या पाऱ्याने उच्चांक गाठला आहे. त्यामुळे घरगुती ग्राहकांपासून रसवंतीगृह चालक, सरबत विक्रेते, हॉटेल व खानावळी चालकांच्या कडे लिंबूची मागणी प्रचंड वाढली आहे. तथापि, मागणीच्या तुलनेत लिंबाची आवक कमी होत आहे. महिनाभरापूर्वी घाऊक बाजारात रोज १५ ते १६ क्विंटल लिंबाची आवक होत होती.सध्या बाजारात दररोज फक्त ८ ते १० क्विंटल लिंबांची आवक होत आहे. यामुळे बाजारात लिंबांच्या किमतीत मोठी वाढ दिसून येत आहे. लिंबाच्या आकारावर आधारित एक गोणीमध्ये साधारणतः ३०० ते ४०० लिंबू असतात. या वाढत्या मागणीमुळे किरकोळ बाजारात एक लिंबू पाच ते सहा रुपयांच्या दराने विकले जात आहे.

यामुळे सरबत विक्रेत्यांना आणि हॉटेल व्यवसायांना लिंबांच्या खरेदीसाठी अधिक खर्च करावा लागत



आहे. आणखी, पिकाच्या काळातच लिंबांची आवक कमी होणे हे एक मोठे कारण आहे, ज्यामुळे दर वाढले आहेत. अनेक व्यापारी व ग्राहकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे की, लवकरच ही स्थिती सुधारेल की नाही. बाजारातील स्थिती यापुढे कशी बदलते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.उन्हाचा चटका वाढल्याने लिंबांच्या आणि काकडीच्या मागणीत मोठी वाढ झाल्याचं चित्र पुण्यातील मंडई मध्ये पहायला मिळालं. उन्हाळ्यात रसवंतीगृह चालक, सरबत विक्रेते, फळ विक्रेते तसेच घरगुती ग्राहकांकडून लिंबसह काकडीला मोठी मागणी पाहायला मिळतेय. किरकोळ बाजारात एक लिंबू १३ ते १५ रुपयांना तर त्याचा वाटा ५० रुपयांपर्यंत पोहचला आहे. दुसऱ्या बाजूला, किरकोळ बाजारात काकडीनं सुद्धा भाव खाल्ला आहे. बाजारात काकडी जवळपास ५० रुपये ते ६० रुपयांपर्यंत प्रति किलो पर्यंत गेली आहे. उन्हाळी वातावरणात प्रचंड प्रमाणात काकडीचे उत्पादन होतं पण दुसऱ्या बाजूला मागणी सुद्धा वाढल्यामुळे दर सुद्धा वाढले आहेत.

## विहिरीत उडी घेऊन विद्यार्थिनीने आयुष्य संपवलं

### शाळेच्या आवारातच टोकाचं पाऊल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती :** अमरावती जिल्ह्यातील वरुड येथे एक धक्कादायक घटना घडली आहे. वरुड येथील एका विद्यार्थिनीने विहिरीत उडी घेऊन आपलं जीवन संपवलं आहे. अंकिता शेंडे (रा. लिंगा) असं विद्यार्थिनीचं नाव आहे. ती महात्मा फुले विद्यालय येथे शिक्षण घेत होती. हांडेवाडीतील वस्तीगृहात ती राहत होती. पटेल ले-आउटमधील सार्वजनिक विहिरीत उडी घेऊन तिने आत्महत्या केलीय. आत्महत्येची घटना सायंकाळी ५ वाजता उघडकीस आल्यानंतर तीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला आहे. या विद्यार्थिनीने आत्महत्या का केली? याचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. या संदर्भातील उत्तरीय तपासणी सध्या वरुड पोलीस करत आहेत.



दरम्यान, राज्यात मागील वर्षात २ हजारपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केलीय. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या काळात विदर्भ आणि मराठवाड्यातील २,७०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलीय. विधान परिषदेत आमदार शिवाजीराव गर्जे, आमदार अमोल मिटकरींसह इतर सदस्यांनी तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्याबाबत प्रश्न केला होता. त्या प्रश्नाला उत्तर राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव (पाटील) यांनी दिलं.

मंत्री पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार,अमरावती विभागामध्ये १,०६९ आणि छत्रपती संभाजीनगर विभागात ९५२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. हवामान बदल, ओला, कोरडा दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणा या कारणांमुळे आत्महत्या केल्या असल्याची माहिती मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

## रेल्वेखाली कटून तरुणाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ब अमरावती** – बडनेराच्या सुपर हायवे रेल्वे पुलाखाली एका ३० ते ३५ वर्षीय तरुणाने रेल्वेखाली आत्महत्या केली. शिर धडावेगळे असलेल्या अवस्थेत हा मृतदेह आढळून आला आहे. मृताची ओळख अद्याप पटली नाही. त्याच्या पॅन्टच्या खिश्यामध्ये एका महिलेचे छायाचित्र आढळून आले आहे. पुढील तपास बडनेरा रेल्वे पोलिस करीत आहेत. रेल्वे रुळाजवळ तरुणाचा मृतदेह असल्याची माहिती मिळताच बडनेरा रेल्वे पोलिस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली



असता मृतक तरुणाचे धड आणि डोके वेगळे असल्याचे दिसून आले. बडनेरा पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात ठेवला आहे. मृताची ओळख पटवण्याचे प्रयत्न पोलिस करीत आहेत.

## बेलोरा विमानतळाला अण्णाभाऊ साठे यांचे नाव द्या।

### विदर्भ लहुजी सेनाची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१**अमरावती

अमरावती येथील बेलोरा विमानतळाला साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे,अशी मागणी विदर्भ लहुजी सेनेने जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गुरुवारी २० मार्च रोजी निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की,महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. जगभरात त्यांच्या साहित्य संपदेची नोंद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाने वेगवेगळ्या स्मृतीस्थळांना, प्रेरणा स्थळांना तसेच नवनवीन निर्माण होणार्या वास्तूंना, विमानतळांना, विद्यापीठांना, संपूर्ण राज्यातील




आदर्श मानल्या जाणार्या महापुरुषांचे नाव देऊन त्यांचा गौरव केला आहे. याच पार्श्वभूमीवर बेलोरा विमानतळाला अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. यावेळी आकाश खडसे, सागर लोखंडे ,जयकांत स्वर्गे, अभिषेक खंडारे, महेंद्र खडसे, शुभम राऊत ,सुरज डोंगरे ,गोपाल गवई, कृष्णा भोंगे, विकी डोंगरे कैलास खडसे, कैलाश वानखडे, प्रकाश लोखंडे आदि उपस्थित होते.

## पत्रकार विठ्ठल महल्ले यांच्यावर प्राणघातक हल्ला

### पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हे दाखल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१ अकोला** शहरात गुन्हेगारी प्रवृत्तींनी पुन्हा डोके वर काढले. पोलीस प्रशासनाचा या गुन्हेगारांवर कवडीचाही वचक राहला नसल्याचे दिसून येत आहे. बुधवारी रात्री एका वृत्तपत्राचे वरिष्ठ क्राइम रिपोर्टर विठ्ठल महल्ले यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. भर रस्त्यात बसून रील बनविणार्यांनी सदर हल्ला केल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी खदान पोलीस ठाण्यात पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुरुवारी दुपारी गुन्हे दाखल करण्यात आले असून एकाला ताब्यात घेतले असल्याचे माहिती आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, बुधवारी रात्री पत्रकार विठ्ठल महल्ले आपली ड्युटी आटोपून घरी जात असताना अकरा वाजताच्या सुमारास खडकी परिसरातील डंपिंग ग्राउंड नजीकच्या रस्त्यावर तीन युवक मद्यधुंद होऊन रील बनवित होते. यावेळी तेथून जात असताना विठ्ठल महल्ले यांनी त्यांना जायला रस्ता तर सोडा असे म्हटले असल्यास या तिन्ही युवकांनी महल्ले यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली तसेच तू पत्रकार आहे आम्हाला माहित आहे खूप सत्य



छापण्याची तुझ्यात खाज आहे ना आज ती गमावून टाकतो असे म्हणत महल्ले यांच्याच हेल्मेट ने त्यांना मारहाण करणे सुरू केले. यावेळी महल्ले यांनी हल्लेखोरांच्या तावडीतून आपली सुटका करीत कसेबसे आपले प्राण वाचविले. गुरुवारी सकाळी या घटनेची माहिती संपूर्ण शहरात वार्यासारखी पसरली. यावेळी पत्रकार संघटनांनी महल्ले यांच्यासोबत खदान पोलिस स्टेशन गाठत या संपूर्ण प्रकरणाची माहिती खदान पोलिसांना दिली. तसेच या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. विठ्ठल महल्ले यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुन्हे दाखल केले आहे.

## व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तरुणीला केले ब्लॅकमेल

### लाखांनी गंडविणा-या आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१ अमरावती–** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत शिक्षणासाठी नातेवाईकांच्या घरी राहणार्या एका १९ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीला ओळखीचा फायदा घेत काढलेले फोटो-व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देउैन लाखो रुपयांनी गंडविण्यात आले. या प्रकरणात पोलिसांनी तरुणीच्या तक्रारीवरून आरोपी निलय संतोष पवार विरुद्ध कलम ७५,७८,३०८ (२),३५१(२), पोस्को ॲक्ट चे कलम १२ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

माहितीनुसार वाशिम जिल्ह्यातील तरुणी अभ्यासासाठी राजापेठ पोलीस ठण्याच्या हद्दीत आपल्या नातेवाईकांच्या घरी राहते आणि शिक्षण घेत आहे. या दरम्यान तिची ओळख तिच्या वर्गात शिकणार्या आणि वाशिम मध्ये राहणार्या आरोपी निलय पवार सोबत झाली. दोघांमध्ये मैत्री वाढत गेली. तिने आरोपी निलय सोबत फोटो आणि व्हिडिओ काढले. त्यानंतर निलय तिला रात्री बेरात्री कधीही फोन करू लागला. तिला बाहेर भेटायला बोलवू लागला. तिने नकार दिल्यावर आरोपी निलय पवार ने तिला फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पैशाची मागणी केली. निलय तिला ब्लॅकमेल करू लागला.

# पंतप्रधान मोदींच्या ३८ परदेश दौऱ्यांवर २५८ कोटींचा खर्च! केंद्राने संसदेत दिली सविस्तर माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१नवी दिल्ली–** केंद्र सरकारने गुरूवारी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यांच्या खर्चाचा तपशील जारी केला आहे. यानुसार मोदी यांच्या मे २०२२ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत झालेल्या ३८ परदेश दौऱ्यावर जवळपास २५८ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

या ३८ दौऱ्यांपैकी सर्वाधिक खरच् हा जून २०२३ मध्ये केलेल्या अमेरिका दौऱ्याच्या वेळी झाला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका भेटीसाठीसाठी २२ कोटी रुपयांहून अधिकचा खर्च झाला, पीटीआय या वृत्त वाहिनीने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. ही माहिती परराष्ट्र राज्यमंत्री पबित्रा मार्गेरिटा यांनी गुरूवारी राज्यसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली आहे.

विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी यासंबंधीचा प्रश्न विचारला होता. त्यांनी भारतीय दूतावासांनी गेल्या तीन वर्षांच्या



कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यांसाठी एकूण किती खर्च केला याबद्दल खरगे यांनी विचारणा केली होती. ज्यामध्ये हॉटेल व्यवस्था, सामूहिक स्वागत समारंभ, वाहतूक याबरोबरच इतर खर्चाचा तपशील देखील विचारण्यात आला होता.

दरम्यान या प्रश्नाला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यांसाठी झालेला खर्च तसेच अधिकार्यांवर झालेला खर्च, सोबत असणारे लोक, माध्यम डेलिगेशन, सुरक्षा व्यवस्था इत्यादींवर झालेल्या खर्चाचा तपशील देण्यात आला आहे. सविस्तर देण्यात आलेली ही माहिती मे २०२२ ते डिसेंबर २०२४ या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यांची आहे.सरकारकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, जून २०२३ रोजी केलेल्या अमेरिका दौऱ्यावर २२,८९,६८,५०९ रुपये इतका खर्च झाला होता, तर सप्टेंबर २०२४ मध्ये केलेल्या अमेरिकेच्या दौऱ्यावर १५,३३,७६,३४८ रुपये खर्च झाला.

## कोणत्या देशांना भेटी दिल्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ आणि २०२४ यांच्या मध्ये जर्मनी , कुवेत, डेन्मार्क, फ्रान्स, यूएई, उझबेकीस्तान, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, दक्षिण अफ्रिका, ग्रीस, पोलंड, युक्रेन, रशिया, इटली, ब्राझील, गयाना या देशांना भेटी दिल्या आहेत.

## कोणत्या दौऱ्यावर किती खर्च झाला?

पोलंड – १०,१०,१८,६८६ रुपये
युक्रेन – २,५२,०१,१६९ रुपये
रशिया – ५,३४,७१,७२६ रुपये
इटली – १४,३६,५५,२८९ रुपये
ब्राझील – ५,५१,८६,५९२ रुपये
गयाना – ५,४५,९१,४९५ रुपये

दुसऱ्या काही महत्त्वाच्या दौऱ्यांपैकी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मे २०२३ मधील जपान दौऱ्यावर १७,१९,३३,३५६ रुपये आणि नेपाळच्या मे २०२२ मधील दौऱ्यावर ८०,०१,४८३ रुपये खर्च झाला.

# औरंगजेबाच्या कबरीचा वाद, संभाजी नगरमध्ये एनआयए ची टीम दाखल

## संशयित हालचालींवर लक्ष




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१संभाजी नगर**

फोटो घेणे

औरंगजेब कबरीच्या वादानंतर नागपूरमध्ये उसळलेल्या दंगलीनंतर आता बारीक लक्ष ठेवण्यासाठी एनआयएची टीम छत्रपती संभाजीनगरात दाखल झाली आहे. यासोबतच मराठवाड्यातील जालना, परभणी, नांदेड, बीड, उदगीर याठिकाणी देखील एनआयएची टीम लक्ष ठेवण्यासाठी दौरा करीत असल्याचीही माहिती सूत्रांनी दिली आहे.

सध्या एका टीमने छत्रपती संभाजीनगर शहर, खुलताबाद परिसराची पाहणी केली. शिवाय मराठवाड्यातील जालना, परभणी, नांदेड, जवळ असलेल्या विदर्भातील बुलडाणा या जिल्ह्यातही हालचालींवर लक्ष केंद्रित केले आहे. औरंगजेब कबरीच्या पार्श्वभूमीवर दंगल किंवा तेढ उद्भवेल असं कोणी काम करतंय का? यावर एनआयएच्या टीमचे बारीक लक्ष असणार आहे.विशेषतः ज्या जिल्ह्यात, शहरात दंगलीची पार्श्वभूमी आहे त्याठिकाणी तपास यंत्रणेनेककडून रेकी सुरू केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. परभणी, जालना, नांदेड या ठिकाणीदेखील एनआयएची पथके गेले आहेत. तेथील संशयित हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे. त्यासाठी स्थानिक एटीएस अधिकाऱ्यांची मदत घेतली जात आहे.

विदर्भ प्रजासत्ताक

# ‘समृद्धी’वर टोलवाढ; १ एप्रिलपासून अंमलबजावणी तब्बल १९ टक्के जास्त शुल्क भरावे लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१मुंबई** : समृद्धी महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांच्या खिशाला १ एप्रिलपासून कात्री लागणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) ‘समृद्धी’वरील पथकरात १९ टक्क्यांची वाढ केली आहे. हा संपूर्ण मार्ग सुरू झाल्यावर मुंबई ते नागपूर प्रवासासाठी कार चालकांना १,४४५ रुपये, तर नागपूर ते इगतपुरी प्रवासासाठी १२९० रुपये टोल लागेल.नागपूर ते मुंबई या ७०१ किमी अंतरापैकी नागपूर ते इगतपुरी हा ६२५ किमीचा मार्ग सुरू झाला आहे. तर येत्या महिनाभरात इगतपुरी ते आमने हा उर्वरित ७६ किमीचा मार्गही सेवेत दाखल होणार आहे. मात्र हा संपूर्ण महामार्ग खुला होण्यापूर्वीच ‘एमएसआरडीसी’ने त्याच्या टोलमध्ये मोठी वाढ केली आहे.यापूर्वी महामार्ग सुरू झाला तेव्हा म्हणजे डिसेंबर २०२२ मध्ये टोल दर जाहीर करण्यात आले होते. त्यावेळी कार व हलक्या वाहनांसाठी प्रतिकिलोमीटर १.७३ रुपये पथकर आकारला होता.




नागपूर–इगतपुरी प्रवासासाठी टोल किती?

वाहनांचा प्रकार सध्याचे दर नवे दर

कार, हलकी मोटार १०८० १२९०

हलकी, व्यावसायिक, मिनी बस १७४५ २०७५

बस अथवा दोन आसांचा ट्रक ३६५५ ४३५५

तीन आसांची व्यावसायिक ३९९० ४७५०

अवजड बांधकाम यंत्रसामुग्री ५७४० ६८३०

अति अवजड वाहने ६९८० ८३१५१ एप्रिलपासून नवे टोलदर लागू होणार आहेत. पुढील तीन वर्षांसाठी म्हणजेच ३१ मार्च २०२८ पर्यंत ते लागू राहतील, असे एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# ठाकरे गटाला बारामतीत धक्का! पदाधिकारी, जिल्हाप्रमुखांचा पक्षाला रामराम, शिंदे गटात प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१बारामती** – ठाकरे गटातून शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या दृष्टीकोनातून शिवसेना शिंदे गटातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा वाढता ओघ हा एकनाथ शिंदे यांची ताकद वाढवणारा असून, दुसरीकडे मात्र ठाकरे गटासाठी चिंतेचा विषय ठरणारा असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. एकामागून एक शिवसेना शिंदे गटात होत असलेले पक्ष प्रवेशाने ठाकरे गटातील गळती थांबत नसल्याचेच पाहायला मिळत आहे. आता बारामतीत ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत राज्यभरातील ठाकरे गटाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी शिवसेनेत प्रवेश केला. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनीही शिंदे गटात प्रवेश केला. त्यामुळे ठाकरे गटासह आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातूनही शिंदेसेनेत इन्कमिंग सुरू झाल्याचे दिसत आहे. मुंबई, पुणे व रायगड जिल्ह्यातील ठाकरे गटातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांना भावी सामाजिक आणि राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी एक्सवर पोस्ट करून दिली आहे.

ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका आणि बारामती जिल्हाप्रमुख कल्पना थोरवे, विधी विभागाचे प्रमुख संभाजी थोरवे, पुणे उप–शहरप्रमुख नितीन पवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आगरी कोळी समाजाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष मनोहर ठाकूर, उरणचे योगशे



बापर्डेकर, ठाकरे गटाच्या दैनंदिनीची निर्मिती करणारे साकेत पवार आणि व्यवस्थापक स्वप्नील माने, सुनील जाधव, रुपेश सुर्वे यांनीही मूळ शिवसेनेत प्रवेश घेतला. तसेच मानव आधार फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुनील चौधरी यांच्यासह फाउंडेशनचे सदस्य नयन सिंग, महेश शर्मा, संजय सोलंकी, जगदिश कुमावत, सुरेश चौधरी, प्रवीण चौधरी, सिताराम चौधरी, दिनेश चौधरी, नरेश प्रजापती, राजेंद्र मुळे, संजय देशमुख आणि त्यांचे सर्व सहकारी शिवसेनेमध्ये दाखल झाले, असे एकनाथ शिंदे यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

दरम्यान, मुंबईत पालिकेची निवडणूक जेव्हा जाहीर होईल तेव्हा मुंबईतील सर्व प्रभागात लढता येतील एवढे उमेदवार जमवण्यासाठी शिंदे यांच्या शिवसेनेचे प्रयत्न सुरू आहेत. ठाकरेंचे एक–एक उमेदवार गळाला लावण्यात शिंदे यशस्वी होत आहेत. मुंबईतील तीन माजी नगरसेवकांनी उद्धव ठाकरे यांना ‘जय महाराष्ट्र’ करीत शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला. मुंबईतील भांडुपमधील माजी नगरसेवक उमेश पाटील, चेंबूरच्या माजी नगरसेविका अंजली नाईक आणि गोरेगाव येथील माजी नगरसेविका लोचना चव्हाण यांच्यासह अनेक पदाधिकारी, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख आणि कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी दापोलीचे माजी आमदार संजय कदम, छत्रपती संभाजी नगरचे माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगांवकर यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

# एमडी ड्रग्ज विक्रेता गजाआड, ६२.१२० ग्रॅम वजनाचा माल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१बारामती** नागपुरी गेट पोलिसांनी कडबी बाजारातील कंलदरबाबा दर्गाजवळ एमडी ड्रग्ज विक्री करणा–या एका आरोपीला २० मार्च रोजी अटक केली. तर एक आरोपी पसार झाला आहे. रमेशकुमार देवजीराम चौधरी (वय ३२, रा. बापुनगर, पंचायत अचलपुर, ता. जि, साचोर, राज्य राजस्थान, ह. मु. लक्ष्मी नगर, अमरावती) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी तनवीर (रा. दर्यापुर) हा फरार झाला आहे. पोलिसांनी आरोपीजवळून १ लाख ८५ हजार ९४० रुपये किमंतीची ६२.१२० ग्रॅम वजनाची एम.डी. व १५ हजार रुपये किमंतीचा एक मोबाईल असा एकुण २ लाख ९४० रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस आयुक्त नवीनचंन्द्र रेड्डी यांनी अमरावती शहरामध्ये अमली पदार्थ बाळगणारे, विकणारे तसेच सेवन करणा–या लोकांविरुद्ध धडक मोहीम राबविण्यासाठी आदेशीत केले होते. या आदेशान्वये नागपुरी गेटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरलागोंडावार यांच्यासह डि.बी पथकाचे अमंलदार पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की रमेशकुमार देवजीराम चौधरी हा एम.डी.(मॅथेडॉन) नावाचा अंमली पदार्थ बाळगुन तो कडबी बाजारातील कंलदरबाबा दर्गाजवळ विक्री करीता फिरत



आहे. सदर माहितीवरून पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी केली आणि आरोपी रमेशकुमार देवजीराम चौधरी याला कंलदरबाबा दर्गाजवळून ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्या ताब्यातुन ६२.१२० ग्रॅम वजनाची एम.डी. अंमली पदार्थ व मोबाईल असा एकुण २ लाख ९४० रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणात आरोपीविरुद्ध नागपुरी गेट पोलिस ठाण्यात कलम ८ (सी), २२ (सी), २९ एन.डी.पी.एस. अन्वये गुन्हा नोंदविला आहे. या गुन्हाचा पुढील तपास नागपूरी गेट पोलीस करत आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त अरूण पाटील, जयदत्त भंवर यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुरी गेटचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक हनुमंत उरलागोंडावार, सहायक पोलिस निरीक्षक योगेश इंगळे, अनंत ठाकरे, पोलिस उपनिरीक्षक गजानन विधाते, पोलिस हवालदार शिवनाथ आंधळे, दिनेश नांदे, इमरान खान, किशोर रायकर, सुधीर गुडधे यांनी केली आहे.

# उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांना थोडीतरी लाज, शरम असती तर...; रामदास कदमांचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१मुंबई–** दिशा सालियान हिच्या मृत्यूनंतर अनेक आरोप प्रत्यारोप झाले. नारायण राणे यांनी जाहीरपणे आदित्य ठाकरेंचा या घटनेशी संबंध असून माझ्याकडे त्याचे पुरावे आहेत असं सांगितले होते. दुर्दैवाने आतापर्यंत ते कुठलेही पुरावे देऊ शकले नाहीत. मात्र दिशा सालियनच्या वडिलांनी हायकोर्टात धाव घेतली. त्यात आदित्य ठाकरे यांचे नाव घेत त्याच्यासोबत तिघांनी मिळून माझ्या मुलीवर बलात्कार करून तिचा खून केला अशी याचिका दाखल केली आहे. ही बाब इतकी गंभीर आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा नातू आदित्य ठाकरे याच्यावर बलात्काराचा आरोप होतोय, ही चांगली बाब नाही असं सांगत शिवसेना नेते रामदास कदम यांनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे.

रामदास कदम म्हणाले की, ज्या बाळासाहेबांनी मराठी मुलींची इज्जत, अब्रू वाचवली. त्यासाठी भगवा झेंडा खांद्यावर घेत पक्ष काढला. त्या बाळासाहेबांच्या नातवावर बलात्काराचे आरोप होतायेत. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना थोडीतरी इज्जत, लाज, शरम असती तर तोंडाला काळे फासून देश सोडून गेले असते. अनेक गोष्टी अशा होतात पण त्याचे पुरावे मिळत नाही. उद्धव ठाकरे ज्यावेळी आपल्या मुलाला वाचवण्यासाठी पोलिसांशी हाताशी धरून पुरावे नष्ट केलेत का याची माहिती घेणे आवश्यक आहे अशी मागणी त्यांनी केली.

तसेच उद्धव ठाकरे यांनी नारायण राणेंना फोन केला, तुमची मुले आहेत तसा माझा मुलगा आहे अशी चर्चा मी ऐकली. सत्यता किती नारायण राणे सांगतील. मात्र ही बाब महाराष्ट्राला काळिमा फासणारी आहे. आदित्य ठाकरे रात्री ११ वाजता बाहेर पडतो, पहाटे ५ वाजता घरी येतो. हा रात्रभर



नेमका कुठे असतो. कोण तो दिनो, कोण आदित्य पांचाळी त्यांचे आदित्य ठाकरेंशी संबंध काय, या सगळ्यांची चौकशी होणे गरजेचे आहे. दिशा सालियन या मुलीला न्याय मिळाला पाहिजे. दूध का दूध, पानी का पानी होणे आवश्यक आहे असं रामदास कदम यांनी म्हटलं.

दरम्यान, या महाराष्ट्रात मुलींची अब्रू सुरक्षित नसेल, त्यांचे खून होत असतील आणि ठाकरे कुटुंबावर आरोप होत असेल तर उद्धव ठाकरे देशाच्या पंतप्रधानांवर बोलतात, अमित शाहांवर बोलतात. एकनाथ शिंदेंवर बोलतात. वारेमाप देवेंद्र फडणवीसांवर बोलतो त्यांना बोलण्याचा अधिकार आहे का? मातोश्री बाहेर पडण्याचाही नैतिक अधिकार नाही. दिशा सालियनचे वडील कोर्टात गेलेत, कोर्ट काय आदेश देते ते पाहू. कोर्टाने चौकशीचे आदेश दिले तर सखोल चौकशी झाली पाहिजे. जे काही खरे आहे ते बाहेर आणले पाहिजे. बाळासाहेब गेल्यानंतर उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंचे धंदे काय सुरू आहेत हे महाराष्ट्रालाही कळले पाहिजे असंही रामदास कदम म्हणाले.

# प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा अंतर्गत सेंट्रल बँक तळवेल मार्फत अनुदान वितरण

## तळवेल येथील राजेंद्र कडू यांना २ लाखांचा धनादेश प्राप्त




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१तळवेल**

स्थानिक रहिवासी राजेंद्र कडू यांना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अंतर्गत आर्थिक सहाय्याचा लाभ मिळाला आहे. ही योजना भारत सरकारच्या उपक्रमाअंतर्गत सुरू करण्यात आली असून, कमी उत्पन्न गटातील नागरिकांना विमा सुरक्षा देण्याचा यामागील उद्देश आहे. राजेंद्र कडू यांच्या पत्नी च्या मागील काही महिन्यांपासून किडण्या निकामी झाल्याने त्या सतत आजारी असायच्या काही दिवसांपूर्वी त्यांचा आकस्मित निधन झाल्याने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला त्यांच्या पत्नीचा सेंट्रल बँक तळवेल येथे प्रधानमंत्री जीवन ज्योती योजनेमार्फत विमा काढला असल्याने काल त्यांची मुलगी वेदिका कडू यांच्याकडे विमाच्या धनादेश सोपाविण्यात आला यांच्या कुटुंबाला दुर्दैवी घटनेनंतर ₹२ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले. कुटुंबीयांनी या योजनेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि सरकारच्या सहकार्याबद्दल धन्यवाद दिले.

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना ही १८ ते ५० वयोगटातील व्यक्तींसाठी उपलब्ध आहे. केवळ ₹४३६ वार्षिक प्रीमियम भरून योजनेचा लाभ घेता येतो. अचानक अपघात किंवा मृत्यू झाल्यास कुटुंबाला आर्थिक मदत मिळते. वेदिका कडू हिने धनादेश स्वीकारताना बँकेचे सर्वच कर्मचारी यांचे आभार मानले कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी प्रक्रिया पूर्ण करून धनादेश लवकरच मिळविण्यासाठी खूप मोठी मदत झाली व नागरिकांना प्रधानमंत्री जीवनज्योती योजनेमार्फत विमा काढून लाभ घ्यावा असे आवाहन सुद्धा केले संबंधित अधिकाऱ्यांनी नागरिकांना वेळेवर विमा योजना स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. या योजनेच्या माध्यमातून अनेक कुटुंबांना आधार मिळत असून, भविष्यातही ही योजना गरजूंसाठी उपयुक्त ठरणार आहे. यावेळेस बँकेचे शाखा प्रमुख निलेश तयावाडे, लक्ष्मी प्रसाना, नरेंद्र शिवरकर, दिशा अढाऊ, बंडू चव्हाण बँकेचे कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# शिवजयंती उत्सव समिती गोपाल नगर शिवनेरी चौक येथे उत्साहात साजरी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

दरवर्षीप्रमाणे तिथीनुसार शिवजयंती उत्सव गोपाल नगर येथे शिवसेना शहरप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर प्रमुख संजय शेटे यांचे नेतृत्वात दि.१८ मंगळवार ला साजरा करण्यात आला सायंकाळी सहा ते रात्री साडेदहा वाजेपर्यंत शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला.यावर्षी भव्यवेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेमध्ये शहरातील शेकडो महिला मुलं मुली व तरुणांनी सहभाग घेतला होता यामध्ये अ गट बाल शिवाजी ब गट जिजामाता बाल शिवाजी व क गट जिजामाता अशी स्पर्धा ठेवण्यात आली होती यामध्ये प्रथम द्वितीय आणि तृतीय प्रत्येक गटामध्ये तीन विजयी स्पर्धक निवडण्यात आले त्यांना आकर्षक बक्षीस नऊवारी साड्या प्रथम ३१००द्वितीय बक्षीस २१००.तृतीय बक्षीस ११०० व प्रोत्साहन पर ५० महिलांना साड्या तर शंभर विद्यार्थ्यांना स्कूल बॅग देण्यात आले. व विजय त्यांना बक्षीस सोबत टॉपी पण देण्यात आली. स्कूल बॅग साठी अमोल भाऊ लाड यांनी त्यांच्या अमरावती मनोरंजन अँड इंटर टरमेंट असोशियन असोषियन माध्यमातूनमनोरंजन क्लबच्यावतीने विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप करण्यात आले. हजारे यांनी टॉपी देऊन. सत्कार केला. व सोबत संगीताचा कार्यक्रम शिव गीत पोवाडे महाराष्ट्र गीत आर्केस्ट्रा चा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना उपनेते सुधीर भाऊ सूर्यवंशी. प्रीती ताई बंड. ज्ञानेश्वर धाने पाटील. महिला आघाडीचे लक्ष्मी शर्मा गुल्हणे ताई. चंद्रकांत पोपट. परीक्षक अंबुसर माधुरी धर्माळे. राधा देखेकर गजानन गुजरे . अमोल लाड मोहन हजारे गणेश राव तायवाडे सुनील मनोज भुतळा बोने संदेश जयस्वाल संजय गवाडे सचिन गवारे स्वप्नील सोनवणे बाळू चौधरी शाम गवळी बंडू शेटे ऋषिकेश शेटे शिवदास शेटे रवींद्र सोमवंशी मनोज मानके . या कार्यक्रमांमध्ये ज्या लोकांनी भाग घेतला होता. सर्वांना बक्षीस देण्यात आले व जे कार्यक्रमाला उपस्थित होते त्यांनाही प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे शेवटी संजय शेटे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले व खूप चांगल्या प्रकारे लोकांचा प्रतिसाद मिळाला त्याबद्दल सर्वांना धन्यवाद दिले.

# भूजलाचा वारेमाप उपश्यामुळे ११३२ गावांत विहीर खोदण्यास मनाई

## 'जीएसडीए'नुसार सेमिक्रिटिकल, क्रिटिकल, ओव्हर-एक्सप्लॉइटेड गावे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

भूजलाचा वारेमाप उपसा, त्यातुलनेत पुनर्भरण होत नसल्याने भूजलस्तरात कमी येत आहे. यासाठी भूजल सर्वेक्षण विभागाने 'स्टेज ऑफ डेव्हलपमेंट' जमिनीची चार प्रकारे वर्गवारी निश्चित केली आहे. यामध्ये जिल्ह्यातील २००० पैकी ८१३ गावे सेफ झोनमध्ये आहेत, तर सेमिक्रिटिकल, क्रिटिकल, ओव्हर-एक्सप्लॉइटेड वर्गवारीत ११३२ गावे आहेत. या गावांमध्ये शासन योजनांच्या विहिरी खोदण्यास प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. केंद्रीय भूजल प्राधिकरण आणि राज्य भूजल विभाग भूजल पातळी आणि त्याच्या वापरावर आधारित भूजल क्षेत्रांचे वर्गीकरण करतात. जिल्ह्यातील दोन हजार गावांची पाणलोट क्षेत्रनिहाय विभागणी करण्यात आलेली आहे. या गावांमध्ये योजनांच्या विहिरी खोदण्यास मनाई असली तरी सामूहिक विहीर खोदण्यास मनाई नसल्याची माहिती जीएसडीएचे भूवैज्ञानिक प्रतीक चिंचमलातपुरे यांनी दिली.

**बोअरवेल खोदण्यासही प्रशासनाची मनाई**

ओव्हर-एक्सप्लॉइटेड वर्गवारीतील ४७२ गावांमध्ये केवळ विहिरीच नव्हे तर बोअरवेलसुद्धा खोदण्यास मनाई आहे. या गावांमध्ये विहीर किंवा बोअरवेल खोदल्यास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा उपविभागीय महसूल अधिकारी यांच्याद्वारा कारवाई प्रस्तावित केल्या जाते. डार्क झोनमधील मोर्शी, वरुड तालुक्यांसह चांदूर बाजार तालुक्यातील काही गावांचा यामध्ये समावेश आहे.

**विहिरीसाठी प्रतिबंध गावे**


अचलपूर तालुक्यात १६७ गावे, अमरावती ७९, अंजनगाव सुर्जी ९१, भातकुली २७, चांदूर रेल्वे ८, चांदूरबाजार १५५, चिखलदरा ६४, दर्यापूर ६०, धामणगाव ६४, धारणी ९, मोर्शी ८६६, नांदगाव ८६, तिवसा १८ व वरूड तालुक्यात १३९ गावांमध्ये शासकीय योजनांच्या विहिरी खोदण्यास मनाई आहे.

**अशी वर्गवारी**

६० ते ७०% सेमिक्रिटिकल व्हिलेज, ७० ते ८०% क्रिटिकल व्हिलेज, ८० ते १००% ओव्हर-एक्सप्लॉइटेड

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा शनिवारी दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**



केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी शनिवार, दि. २२ मार्च रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांच्या दौऱ्यानुसार, श्री. गडकरी यांचे सकाळी १०.१५ वाजता बेलोरा विमानतळ येथे आगमन होईल. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे आयोजित डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख पुरस्कार वितरण सोहळ्याला उपस्थित राहतील. दुपारी १२.१५ वाजता श्री संत अच्युत महाराज हृदयरोग रुग्णालयातील नवीन कॅथलॅबच्या उद्घाटनाला उपस्थित राहतील. दुपारी १.४५ वाजता शारदा उद्योग मंदिराच्या प्रकल्पाला भेट देतील. दुपारी २.३० वाजता विश्रामगृह येथे अमरावती विभागातील राष्ट्रीय महामार्ग आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्पांची आढावा बैठक घेतील. सायंकाळी ३.४५ वाजता नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या न्यू हायस्कूलला भेट देतील. त्यानंतर सायंकाळी ४.४५ वाजता बेलोरा विमानतळ येथून मुंबईकडे प्रयाण करतील.

# उष्मालाटेपासून बचावासाठी मार्गदर्शक सूचना जारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

हवामान विभागाने विदर्भात उष्मालाटेचा अंदाज वर्तविला आहे.



या पार्श्वभर जिल्हा प्रशासनाने नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरिकांना उष्मालाटेपासून बचाव करावा आणि आवश्यक ती खबरदारी घ्यावी असे आवाहन केले आहे.

काय करावे : तहान लागलेली नसली तरी भरपूर पाणी प्यावे, हलके आणि सुती कपडे वापरावे, बाहेर जाताना गॉगल, टोपी आणि छत्रीचा वापर करावा. उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी डोक्यावर रुमाल किंवा टोपी वापरावी. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास ओआरएस, लस्सी, लिंबूपाणी यासारखी पेये घ्यावे. उन्हाचा झटका बसल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. पशूधन आणि पाळीव प्राण्यांना सुरक्षित ठेवावे आणि त्यांना पुरेसे पाणी द्यावे. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे आणि सनशेडचा वापर करावा. कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करावी. गरोदर महिला आणि आजारी कामगारांची विशेष काळजी घ्यावी.

**काय करू नये**

लहान मुले आणि पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या गाडीत ठेवू नये. दुपारी १२ ते ३.३० वेळेत उन्हात जाणे टाळावे. जास्त शारीरिक श्रमाचे काम करणे टाळावे. तसेच उष्णतेच्या काळात स्वयंपाक करणे टाळावे. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाणे टाळावे, मद्य आणि शीतपेये घेणे टाळावे. उन्हात गाडी चालवणे टाळावे आणि ज्वलनशील पदार्थांपासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिखलदरा येथे रविवारी 'मेळघाट रंगोत्सव'सांस्कृतिक महोत्सवात सेवा आणि स्पर्धांचा संगम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद अमरावती आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी यांच्या वतीने चिखलदरा येथे 'मेळघाट रंगोत्सव २०२५'चे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २३ मार्च रोजी गिरीजन शाळेसमोरील मैदानावर सकाळी १० वाजल्यापासून या महोत्सवाला सुरुवात होणार आहे.पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्षस्थानी राहतील. तसेच, तसेच खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे, आमदार किरण सरनाईक, धिरज लिंगाडे आणि केवलराम काळे उपस्थित राहणार आहेत.महोत्सवात विविध सेवांची माहिती आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यात नागरिकांसाठी आधार अपडेट, ॲग्रीस्टॉक नोंदणी, रेशनकार्ड नोंदणी, गोल्डन कार्ड नोंदणी, असंसर्गजन्य रोगांची चाचणी, सिकलसेल तपासणी, मोफत डोळे तपासणी, विनाशुल्क मौखिक तपासणी, घरकुल योजना आणि रोजगार हमी योजना आणि पोस्ट ऑफिस व बँक खाते उघडण्याची सुविधा राहणार आहे. तसेच लोकनृत्य स्पर्धा, पाककला स्पर्धा, पारंपरिक वेशभूषा आणि पथनाट्य यांसारख्या सांस्कृतिक स्पर्धांही आयोजित करण्यात आल्या आहे.मेळघाट रंगोत्सवातील विविध शासकीय सेवा आणि योजनांची माहिती देण्यात येणार असल्याने नागरिकांनी सहभागी होऊन शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, धारणीच्या उपविभागीय अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी केले आहे.

# अवैध गौणखनिज वाहतूक करणाऱ्या जप्त वाहनांचा लिलाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव मंगळवार, दि. २५ मार्च रोजी दुपारी १२ वाजता तहसीलदार कार्यालयात होणार आहे.

गौणखनिज भरारी पथकांनी अवैध गौणखनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली आहे. यात वाहन मालकांनी दंड भरलेला नसल्याने १७ वाहनाचा लिलाव केला जाणार आहे.इच्छुकांनी लिलावात सहभागी व्हावे, यासाठी २५ हजार रुपये इसारा रक्कम भरणे, पॅन कार्ड आणि रहिवासी पुरावा देणे आवश्यक आहे, असे अचलपूर तहसीलदार यांनी कळविले आहे.

# वीजबिल भरा अन् गैरसोय टाळा;महावितरणचे जाहिर आवाहन

## सुट्टीच्या दिवसीही सुरू ठेवण्यात आली वीजबिल भरणा केंद्रे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २१ अमरावती**



परिमंडळाअंतर्गत महावितरणला पुढील १० दिवसात १५२ कोटी वसूल करायचे आहे.त्यासाठी महावितरणने मोहिम तीव्र केली असून वसूलीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याचे आदेश कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहे.त्यामुळे वीज ग्राहकांनी चालू तसेच थकीत वीजबिल भरावे आणि आपली गैरसोय टाळावी असे आवाहन महावितरणने केले आहे.

चालू आर्थीक वर्षाचे केवळ १० दिवस शिल्लक आहे .प्रत्येक दिवसाला १५ कोटी वसूल करायचे आहे.वसुलीसाठी कर्मचारीच नाही तर मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्यासह अधीक्षक अभियंता(अमरावती) दीपक देवहाते,प्रविण दरोली(यवतमाळ),सर्व कार्यकारी अभियंते आपल्या संपूर्ण टिमसह वसूली मोहिमेत सहभागी झाले आहेत.

**सुट्टीच्या दिवशी वीज बिल भरणा केंद्रे सुरू**

थकबाकीदार ग्राहकांना वीजबिल भरण्याची सोय व्हावी व महावितरणच्या कारवाईमुळे त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी सुट्टीच्या दिवशी वीज बिल भरणा केंद्रे सुरू ठेवण्यात आली आहेत. www.mahadiscom.in या संकेतस्थळावर व मोबाईल ॲपद्वारेही घरबसल्या कोठूनही वीज बिल भरता येते. ऑनलाइन वीज बिल भरल्यास वीज बिलामध्ये ०.२५ टक्के आणि पहिल्या सात दिवसांत (Prompt Payment) बिल भरल्यास १ टक्का असे एकूण १.२५ टक्के सूट मिळते. क्रेडिट कार्ड वगळता इतर पर्यायांद्वारे ऑनलाइनद्वारे होणारा वीज बिल भरणा निःशुल्क आहे.

